# तन्हाई



आनंदिनी



# तहानी

आनंदिनी

ई साहित्य प्रतिष्ठान

पुस्तकाचे नांव:        तहानी

प्रकार : कथा

लेखिका : आनंदीनी

प्रकाशन :      ई साहित्य प्रतिष्ठान®

esahity@gmail.com

www.esahity.com

©esahity Pratishthan® 2014

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

• या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे  पुनर्मुद्रण किंवा एकांकिका, नाटक. सिनेमा. सिरियल. स्टेज शो किंवा तत्सम रुपांतर किंवा भाषांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे.

*तुझी कथा*

*तुलाच अर्पण*

--------आनंदिनी

या कथेतील सर्व नांवे, व्यक्ती आणि स्थळे काल्पनिक असून

त्यांचे कोणाही जीवीत वा मृत व्यक्तींशी साम्य आढळून आल्यास

तो केवळ योगायोग समजावा.



# तहानी

पहाटेचे साधारण अडीच तीन वाजले असावेत.

पाणी प्यावेसे वाटले. म्हणून वीणा जागी झाली. बाजूचे पाण्याचे भांडे रिकामे होते.

तिला उठल्यावर जाणवले, आज बऱ्याच दिवसांनी इतके फ्रेश आणि हलके वाटत होते. नाहीतर गेले तीन आठवडे म्हणजे बाळंत झाल्यापासून अगदी गळून गेल्यासारखे वाटत होते. नुसत्या बोटांच्या हालचालीने सुद्धा मरणयातना होत. पण आता बराच हुरूप जाणवत होता.

तिचा पिल्लू पाळण्यात शांत झोपला होता. किती छोटासा, निरागस कोमल जीव. इवला इवला. गोंडस. इवलाले हात. इवलुशी मूठ. आणि गोरे गोरे पाय. बाळ अशक्त होता का? बाकिची मुलं कशी

गुलाबी गुलाबी दिसतात. हा काहिसा पांढुरका दिसत होता. की तिच्या आईच्या मनाला तसं वाटत होतं? प्रत्येकच आईला आपला मुलगा अशक्तच वाटतो.

पाणी प्यायचे सोडून वीणा त्याच्याजवळ गेली.  तो शांत झोपला होता. तिला त्याच्यावरून नजर हटवेना. तिचा पती कमलेश देखील शांत झोपला होता.  "मला आता बरे वाटत आहे, फ्रेश हलके वाटत आहे" असे त्यांना पटकन उठवून सांगावे असे तिला वाटले,पण उगाच झोपमोड कशाला म्हणून तिने त्यांना नाही उठवले.

तेवढ्यात... खट्ट... घरातच काहीतरी भांड्याचा आवाज आला. ती दचकली. म्हणजे आवाज मोठा असा नव्हता. अचानक होता असंही नव्हे. कदाचित मघा ती त्या आवाजानेच जागी झाली असावी.

खट्ट... खट्ट...

कुठे आवाज येतोय म्हणून ती बाहेर आली. किट्ट अंधार असला तरी घर तिच्या पायाखालचं होतं. शेजारीच सासूबाईंची बेडरूम होती.  तिने सासूबाईंच्या खोलीत डोकावून पाहिले.  त्याही शांत झोपल्या होत्या. त्यांच्या कुशीत वीणाची मोठी मुलगी करुणा पण शांत झोपली होती. हल्ली ती सासूबाईंबरोबरच असे. तिथे कसलीच हालचाल नव्हती.

खट्ट...

ती भराभर आवाजाच्या दिशेने चालू लागली. आणि मधेच थांबली. “अरेच्या! मी भरभर देखील चालू शकते. म्हणजे मी खरोखर बरी झाली आहे!” तिला खूप खूप मोकळं वाटलं. अगदी कालपरवापर्यंत सूप प्यायला सुद्धा हाताला धरून उठून बसवावं लागे तिला. स्वतःहून असं उठताही येत नसे.

तिला सगळा भूतकाळ आठवला. लग्नानंतर पहिल्याच वर्षात झालेली काळयाभोर डोळयांची करुणा. तिच्यामुळे घरात फुललेली बहार. पण “मुलगा हवा” म्हणून सासुबाईंचा हट्ट, त्यांचे टोमणे, त्यासाठी केलेले नवस, उपास – तापास. गांवातल्या सगळया देवांचे उंबरे झिजवले. शेवटी मोगरवाडीतल्या त्या साधूबाबाचे अघोरी उपाय. ते अबोर्शन आणि तिच्या गायनेकने केलेली वॉर्निंग. त्यांनी अगदी बजावले होते की आता परत आई बनणे वीणासाठी खूप धोक्याचे आहे. तिच्या जीवाचे काही बरे वाईट सुद्धा झाले असते. पण सासूबाईंच्या हट्टा समोर कुणाचे काही चालत नव्हते. नवऱ्याचेही नाही. अखेर तिने सर्व काही परमेश्वरावर सोडले होते. आणि त्याच्याच कृपेने आज तिला पूर्ण बरे वाटत होते.

खट्ट… पुन्हा आवाज आला.

वीणा भानावर आली.

ती त्याच पाउली परत फिरली आणि सासूबाईंच्या खोलीत गेली. तिने मोठ्या मुलीला, करुणाला, कितीतरी दिवसात नीट पहिले देखील नव्हते. बराच वेळ तिला न्याहाळत बसली. बिचारी करुणा. किती गं समजूतदार पोर माझं. कसला म्हणून हट्ट नाही. तिला जवळ घेऊन फ़ारसे लाड करायची संधी कधीच मिळाली नाही वीणाला. एकदाच माहेरी घेऊन गेली होती, दोन दिवस, तेवढंच. करुणाही आईवेगळी रहायला शिकली होती. म्हणजे तसं म्हणायचं. खरंच, कुठलं मूल आईवेगळं रहायला शिकतं का कधी? वीणाला सुद्धा स्वतःच्या आईची आठवण यायचीच की. भरून यायचं मन. पण काय करता? कितीही झालं तरी सासू ती सासू आणि माय ती माय.

खट्ट... खट्ट...

तितक्यात सासूबाईंनी कूस बदलली. बहुधा त्यांनाही तो आवाज ऐकू गेला असावा. त्यांना चाहूल लागण्यापुर्वी ती तेथून लगबगीने निघाली. हॉलमधील घड्याळात पाहिले तर साडे तीन वाजले होते.

खट्ट...

पुन्हा आवाज आला. आवाज तर अजून येतच होता. भांड्यांचाच. आवाज कोठून येतोय हे पाहण्यासाठी ती जीना उतरून

खाली आली.  येऊन हॉल मध्ये मधोमध उभी राहिली आणि कानोसा घेतला. आवाज किचन मधून येत असावा.

पहाटेच्या साडे तीन वाजता कोण असेल इकडे?

वीणाने जनीच्या झोपायच्या जागेकडे नजर टाकली. जनी तर तिच्या जागेवर मुटकुळी करून गाढ झोपली होती.  बिचारी दमतेच तेवढी कामाने. मग इतकी गाढ झोपणारच की.

वीणाने खिडकीतून व्हरांड्यात नजर टाकली. बाहेर रस्त्यावरचा लाईट एकटाच  भगभगत होता. त्या प्रकाशात रोजच्या ओळखीच्या वस्तूही भेसूर दिसत होत्या. रस्त्यावरचे डिव्हायडर एखाद्या सरपटणाऱ्या प्राण्याची खांडोळी केली असावी तसे दिसत होते. तिने दामूच्या झोपायच्या जागी नजर टाकली. दामू सुद्धा व्हरांड्यात झोपलेला खिडकीतून दिसत होता. त्याचे अवाढव्य पोट वरखाली होत होते. दामू म्हणजे कुंभकर्णाचाच अवतार. पण त्याच्या मिशीदार पर्सनॅलिटीचा असा असर होता की भुरटा चोर  सोडाच पण दरोडेखोरांची पण या घराकडे बघायची हिंमत झाली नव्हती.

पण मग किचन मध्ये कोण असावे? चोर? ... छे... छे! बाहेर दामू असताना आणि दार आतून बंद असताना चोर कसे येतील आत? आणि सारे घर सोडून ते किचन मध्ये काय जेवायला जातील का? तिचे  तिलाच हसायला आले.  बहुधा मांजर असावे.

तसं त्यांच्याकडे पाळलेलं मांजर नव्हतं. तिच्या माहेरी खुप मांजरं असत. लटांबरच. सतत पायात घुटमळत. अंग घासत.

मांजरांना कुरवाळत कुरवाळतच ती लहानाची मोठी झाली. त्यामुळे या घरात सुरुवातीला तिला मांजराशिवायचं घर अपुरं वाटायचं. पण नंतर नंतर सवय होत गेली. आता हे एखादं चोरटं मांजरच घरात शिरलं असावं.

चला पाहू, म्हणून हळू हळू दबक्या पावलांनी ती गेली. मांजरावरुन तिला मांजराची कविता आठवली. करुणाच्या तिसरीच्या पुस्तकात असलेली. “मनी माऊचे बाळ कसे गोरे गोरे पान.” तिला तिच्या गोड गोऱ्या गोऱ्या तान्हुल्याची आठवण झाली. आणि ती मनाशी हसली. रहावेना तिला. त्याला पहायला तिची पाऊले परत बेडरूम कडे वळणार तोच...

तोच... खट्ट...

परत भांड्यांचा स्पष्ट आवाज आला. हा आवाज भांड्यांचा नव्हता. चुकून होणारा नव्हता. मांजराची खुडबुडही नव्हती. असे वाटत होते कोणी तरी स्टीलचा पेला घेऊन फरशीवर आपटत आहे. मग तिने हळूच किचन मध्ये प्रवेश केला. आवाज येतच होता. आजूबाजूला किट्ट अंधार होता. मांजरीचे डोळे कुठे चमकत आहेत का म्हणून तिने आजूबाजूला पहिले, पण तसे काही नाही दिसले. म्हणजे मांजर नव्हते हे तर नक्की. पण आवाज तर अजूनही येतच होता. तिला थोडी भिती वाटली, पण तिने पटकन लाइटचे बटन दाबले आणि किचन मधला लाइट लागला.

प्रकाश पडताच ती पाहतच राहिली आज कितीतरी दिवसांनी किचन मध्ये आली होती, आधी बेडरेस्ट मग बाळंतपण. त्यामुळे तिचं किचन सुटल्यासारखंच झालं होतं. तिला किचनमध्ये प्रत्येक वस्तू जागच्या जागी लागे. आईंनी आणि जनीने अगदी छान ठेवले होते स्वयंपाक घर. अगदी तिला लागते तसे - भांडी सारी स्वच्छ, चकचकीत आणि जागच्या जागी असलेली.

स्वयंपाकाचा ओटा, शेगड्या सगळे अगदी चकचकीत होते. ती मनातून खूप आनंदली. आणि थोडी खट्टूही झाली. आपल्यावाचून कोणाचेच काही अडत नाही याचं तिला वैषम्य वाटलं. अगदी करूणाचंही. पण लगेच ती सावरलीही. “आता मी पण लवकरच माझ्या किचन मध्ये काम करायला लागेन, कमलेश साठी चहा, आईंची कॉफी, नाष्टा, माझ्या करुणाचा डबा आणि माझ्या तान्हुल्यासाठी खीर.” तिला डोळयांसमोर सारं चित्र दिसायलाही लागलं. त्या सुंदर चित्राने तिचं मन भारल्यासारखं झालं. ती तिचे भान हरखून उभी होती.

खट्ट...

परत भांड्यांचा स्पष्ट आवाज आला आणि ती एकदम भानावर आली. पण समोर तर कोणीच दिसत नव्हते. आजूबाजूला पण कोणी नव्हते. मग ती थोडी पुढे गेली आणि फ्रीज च्या बाजूला पाहिले. आणि ती पाहतच बसली................. थोडा वेळ तिला काही सुचेच ना.

फ़्रीजच्या कोपऱ्याशी सांदीत एक छोटीशी गोड मुलगी बसली होती.  असेल ३-४ वर्षांची. खूप गोड होती. गोरी पान गोंडस.  अंगात सुरके घातले होते.  आणि एका स्टील च्या पेल्याबरोबर बिनधास्त खेळत होती.  तिला वीणा आल्याचे भान देखील नव्हते.  त्या पेल्यातून थोडेसे दूध खाली सांडलेले दिसत होते.  आणि तिच्या हनुवटी, तोंडालाही थोडे दूध लागले होते.  त्यामुळे ती आणखी छान दिसत होती. तिचे  केस छोटेसे कुरुळे होते.



तिला पाहून क्षणभर वीणाचं भानच हरपलं. एखादं सुंदर फ़ूल पाहून हरपतं तसं. इतकं सुंदर पोर. तिच्यातलं सगळं वात्सल्य कंठाशी आलं. असं वाटलं की या मुलीला घट्ट कवटाळावं. सोडूच नये. वाव. इतकी सुंदर मुलगी! पण लगेच वीणा भानावर आली.

वीणाने अंदाज घ्यायचा प्रयत्न केला. कोण असेल ही? आणि इतक्या रात्री आपल्या घरात कशी काय आली असावी?  ही सापडत नाही म्हणून हिच्या आईचे काय हाल झाले असावेत ? नाना तऱ्हेचे विविध प्रश्न तिच्या डोक्यात

एकाच वेळेला आले.  जनीची तर कोणी नसावी? मग ती जागेवर नाही म्हणल्यावर जनी जागी झाली असती!!.

तिने  विचार केला असे तर्क काढण्यापेक्षा सरळ मुलीलाच विचारावे.  ती तडक गेली आणि छोट्या मुलीच्या समोर जाऊन उभी राहिली.

छोटीने तिला पाहिले आणि अजिबात लक्ष न देता परत आपल्या पेला आपटण्याच्या उद्योगाला सुरुवात केली. जणू ती तिथे नव्हतीच. पण वीणाला तिच्या नजरेत ती आरपार भेदकता जाणवल्यावाचून राहिली नाही. वीणाला राहवेना. ती तिच्या समोर बसली आणि मायेने तिच्या डोक्यावरुन हात फिरवला.

तेव्हा मात्र ती मुलगी एखादा विजेचा धक्का बसावा तशी झाली. तिच्या चमकदार डोळयांनी वीणाकडे अविश्वासाने एकटक पाहतच राहिली. जणू मघा तिने वीणाला पाहिलेच नव्हते आणि आताच अचानक वीणा प्रकट झाली. पेल्याबरोबर खेळणेही तिने आता बंद केले होते आणि ती वीणाला निरखत राहिली.  ती काहीच बोलत नव्हती.  तिचे मोठे मोठे डोळे मात्र टचटच भरले आणि काही क्षणातच ओठांची कमान करून ती हुंदके देऊन रडू लागली.

आता मात्र वीणाने तिला मायेने जवळ घेतले आणि आपल्या पदराने तिचे डोळे पुसले. त्या स्पर्शाने वीणाला का कोण जाणे अतीव स्वर्गसुखाचा अनुभव आला. त्या व्याकुळ डोळयांकडे पाहून वीणाचे मन हेलावले. तिला वाटले आपण जवळ घेतल्याने पोर रडायची

थांबेल. तरीही ती हमसून हमसून रडतच होती. वीणा गहिवरली. तिने तिला परत उराशी धरले आणि प्रेमाने तिच्या गालावरून हात फिरवला. "तुझं नाव काय आहे बाळा?". ती काहीच बोलली नाही. तिचे काळेभोर डोळे परत परत भरत होते आणि वीणा ते सतत पुसत होती. तू इथे कशी आलीस? कोणी आणले तुला इथे? का रस्ता चुकलीस? जनी मावशी बरोबर आली आहेस का तू?" परंतु ती काहीच सांगेना आणि परत रडू लागली.



वीणा त्या मुलीला कडेवर घेऊन जनीकडे गेली. तिला 3-4 वेळा हाक मारली "जनी, ए जनी या बाळाला तू आणलेस का घरी आपल्या? तुला माहीत आहे का हिची आई कोण आहे?" पण जनी काही केल्या उठायला तयार नव्हती, साधी हलत सुद्धा नव्हती.

मग वीणाने दामूला उठवण्याचा प्रयत्न केला तो पण गाढ झोपला होता. तो पण उठला नाही. मग ती परत त्या छोटीला घेऊन किचन मध्ये आली . ती अजूनही हमसून हमसून रडतच होती. दमत होती. आणि तरीही रडत होती.

मग वीणाच्या लक्षात आले. ती म्हणाली “तुला भूक लागली का?” तिने नकारार्थी मान हलवली.

“मग तुला आईकडे जायचे का?” तरीही तिने नकारार्थी मान हलवली.

“मग तू का रडत आहेस बाळा?” वीणा अस्वस्थ होऊन परत परत विचारात होती .

तशी हळूच आणि रडव्या स्वरात छोटी म्हणाली, “तू मला पायलं म्हणून मी लल्ते, तू मला का पाहिलं? ऊं.......... ऊ............ ऊं ..........” .

वीणाला वाईट वाटले, ती म्हणाली “अग बाळा, मी तुला रागावणार नाही की मारणार नाही .तू घाबरू नकोस. चल ये आपण दोघी खेळुया का?” मग तिने तिच्या बरोबर आपडी तापडी खेळली, वरण- भात- तूप- पोळी- साखर वाला खेळ खेळला आणि ती छोटी हसायला लागली.

तेव्हा कुठे वीणाच्या जीवात जीव आला. आता परत हळूच वीणा म्हणाली “तुझे नाव सांग न मला !” छोटी म्हणाली “नाही“

परत वीणा म्हणाली “मग तुझी आई कुठे आहे ते तरी सांग.” तिने वीणाकडे बोट दाखवले आणि वीणाच्या कुशीत शिरली.

वीणाला खूप वाईट वाटले. तिने विचार केला “किती निरागस बाळ आहे, कोणाचे आहे कोणास ठाऊक, हिची आई हिला शोधून हैराण झाली असेल. वीणाचे मातृहृदय भरून आले.

घड्याळात पाहीले सव्वा चार वाजले होते. जरासे उजाडले की हिच्या आईचा शोध घेऊन तिच्या सुपूर्द करून टाकू. तोपर्यंत हिच्याशीच बोलूया, अजून काही माहिती मिळते का पाहू.

“आच्चं होय, म्हणजे तुझी आई माझ्यासारखीच दिसते तर.”

छोटीने मान डोलावली.

“तुला इथे कोणी आणले?” वीणाने विचारले.

“मीच आले- माझी मीच” छोटी तोंडातल्या तोंडात गुडगुडली.

“बहुधा ही चुकून घरात आलेली दिसते आणि घाबरून लपून बसली असावी आणि भूक लागली की किचनमध्ये आली असावी दूध प्यायला. बिचारी ! किती गोंडस आहे. आवाज पण किती मधाळ आहे. डोळे टपोरे सुंदर. गोबरे मऊ मऊ गाल. आणि रडून रडून अश्रुंनी गालावर आलेले ओघळाचे डाग आणि गोरी पान छान अशी .

पण ही 3-4 वर्षांची असूनही अशी नुसत्या सुरक्यावर कसे काय ठेवले हिच्या आईने हिला! हिची बिचारी आई हिला शोधून शोधून हैराण झाली असावी. मी समजू शकते तिची अवस्था, शेवटी मी पण दोन मुलांची आई आहे. आणि सुंदर तर माझी करुणा पण

आहे, तिचेही डोळे असेच आहेत. पण ती पण अशीच गोंडस असायला पाहिजे होती. आता माझा तान्हुल्या कोणासारखा दिसेल यांच्यासारखा की माझ्यासारखा, कोणास ठाउक? अरे देवा तो उठला तर नसेल ना!! जाऊन पाहू का? पण ही छोटी पण एकटीच आहे इथे, घाबरेल बिचारी. असे करते, तिला घेऊनच जाऊन बघते. तो उठला नसेल तर परत कीचन मध्ये येऊन हिच्याशी गप्पा मारूया” वीणा स्वत:शीच विचार करत होती.

तिने छोटीला उचलून घेतले आणि जिन्याच्या पायऱ्या चढून वर जाऊन पाहिले. तीन चार वर्षांच्या मुलीला उचलून देखील ती आरामात जीना चढून गेली. आपण ठणठणीत बरे झाल्याचा तिला खूप आनंद होत होता. बाळ पाळण्यात शांत झोपले होते. ते पाहून ती निर्धास्त होऊन छोटीला घेऊन परत खाली आली. किचन मध्ये बसून परत दोघींच्या गप्पा चालू झाल्या.

“मला आई म्हणालीस ना, मग आईला खोटे सांगतात का कधी?”

छोटीने “नाही” म्हणून मान डोलावली.

“मग सांग पाहू, तुला भूक लागली का, काही खायला देऊ का?”

छोटीने परत “नाही” म्हणून मान डोलावली.

“तू इथे कशी आलीस सांग न बाळा, मी प्रॉमिस करते मी कोणालाही काही सांगणार नाही. मी सर्वांना सांगेन की तुला मीच

आणले इथे, मग तर झाले, आता तरी सांग बाळा,  बोल ग काहीतरी सोनुल्या ”

छोटी सांगू लागली “ मी ना खूप छोटी होते , तिच्या इवल्या इवल्या हातांची छोटीशी ओंजळ करीत म्हणाली खूप खूप छोटी होते, तेव्हा ना मला हाकलून दिले माझ्या आईने.”

वीणाच्या अंगावर क्षणात शहारा आला “बाप रे! कोठून हाकलले तुला आणि का?”

छोटी बोलू लागली “मला काहीच माहिती नाही, मी तर शांत झोपले होते, मी तर त्रास पण देत नसे कधी आईला. झोपेतही माझ्या कानी काही शब्द पडले. नकोय ही आम्हाला इथे. हिला संपवा. आणि माहिती आहे, हे माझी आई बोलत होती.”

वीणा “काय? अग कोणतीच आई असे बोलू शकत नाही.  ती तुझी सावत्र आई होती का?”

छोटी “नाही ग, माझी सख्खी आई होती ती. तिने काही गुंडांना बोलावले. आणि त्यांनी पण मला हाताला, पायाला, गळयाला आवळून आवळून हाकलून काढले. त्यांनी कसली कसली हत्यारे



आणली होती सोबत. सर्वांगावर नुसते जखमांचे व्रण, रक्त बंबाळ झालेली मी. नुसता आक्रोश करीत होते. आई......आई मला वाचव या गुंडांच्या तावडीतून लवकर आई........ उठ ना . पण ती चक्क चक्क गाढ झोपली होती. मी जिवाच्या आकांताने हाक मारूनही उठली देखील नाही. शेवटी मी त्या गुंडांनाच विचारले की मी तुमचे काय बिघडवले आहे म्हणून मला इतक्या वेदना देत आहात. मी इतकी छोटी आहे की मी तुम्हाला विरोध सुद्धा करू शकत नाही मग तुम्ही मला माझ्या घराबाहेर का काढत आहात? आई आई गं !! काय वेदना होत होत्या. अग मग त्यातील एकाने तर माझा पायच तोडला, एकाने हात देखील तोडला, मग गळयावर वार केले. खूप त्रास दिला आणि सांगितले तुझ्या आईनेच सांगितले असे करायला आणि ओढत

फरफटत नेले ग. आणि ते वाक्य ऐकून तर मग मला अगदी मेल्यासारखे वाटायला लागले."

एक एक शब्द ऐकताना वीणाच्या काळजाचे पाणी पाणि झाले.ती हे ऐकून ढसाढस रडत होती. शेवटचं वाक्य ऐकून तर तिला खूप वाईट वाटू लागले. भयानक धक्काच बसला. सगळा तिरस्कार जागा झाला. छोटीच्या आईचा तिला मनापासून राग आला. अत्यंत घृणा वाटू लागली. आणि तिने मनोमन छोटीला आपली मुलगी म्हणून स्वीकारले. तिने तिला त्याक्षणी जवळ घेतले आणि उराशी घट्ट कवटाळून रडू लागली. छोटीने तिच्या इवल्या इवल्या हाताने वीणाची आसवे पुसली आणि शांत हो म्हणाली. जणू आता तीच वीणाची आई झाली होती.

वीणा म्हणाली, "पण मग तू तेव्हा पासून कुठे होतीस आणि हे सारे कधी घडले?"

छोटी उत्तरली "मी खूप खूप छोटी होते, तेव्हा माझ्यासोबत असे घडले, मग त्या गुंडांनी मला एका पोत्यात भरले आणि फेकून दिले. त्यानंतर तिथे एक बाई आली. तीने मला त्या पोत्यातून बाहेर काढले. ती गोरी गोरी होती छान, तिला आठ हात होते आणि तिच्या एका हातात तलवार होती, ती सिंहावर बसून आली होती. आणि तिने माझ्या अंगावरून मायेने हात फिरवला, तसे माझे सगळे जखम,

व्रण निघून गेले आणि मला बरे वाटायला लागले. मग ती मला म्हणाली “मी दुर्गा आहे, तुझ्यासारखीच आहे. घाबरू नकोस, तुला मी तुझे एक स्वतंत्र विश्व देणार आहे, जिथे तुला कोणीही त्रास देणार नाही.” आणि तिने मला इथे सोडले आणि ती निघून गेली”

वीणा सारे ऐकून घेत होती. एवढी छोटी निष्पाप मुलगी खोटं बोलणं शक्यच नव्हतं. त्यानंतर तिने मनाशी निश्चय केला की काहीही झाले तरी हिच्या आईला शोधून काढायचे आणि तिला असे करण्याचा खडसावून जाब विचारायचा. शिवाय कायद्याने हिला दत्तक घ्यायचे. तीचे नाव देखील अशोका ठेवायचे.

वीणा म्हणाली “छोटी तुझे नाव मी अशोका ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. आणि अजून एक महत्वाची गोष्ट, इथून पुढे तू माझ्याच सोबत राहशील कायमची.”

हे ऐकताच छोटी रडू लागली “नको ग आई, ते बाळ अजून किती लहान आहे. त्याला तुझी जास्त गरज आहे, आईची गरज किती असते हे माझ्याहून जास्त कोणीही सांगू शकणार नाही”

तिचे हे शहाणपण बघून वीणाला आश्चर्याचा धक्काच बसला. पण ती हसून बोलली “अग मग हो की मी कुठे नाही म्हणते, मी माझ्या करुणा आणि बाळासोबतच तुलाही सांभाळणार आहे.”

तरीही छोटी रडतच होती “नको आई मी इतकी स्वार्थी नाही ग, नको ग, काही गोष्टीत तूही काही करू शकत नाहीस आणि मी ही नाही.”

वीणा म्हणाली “तू नको काळजी करूस त्याची, मी बघेन कसे करायचे ते. आत्ता सगळे उठले की मी सर्वांना जाऊन सांगणार आहे तुझ्याबद्दल आणि माझा निर्णय ही सांगणार आहे. हे बघ आता सकाळचे सहा वाजलेत. आत्ता उठतीलच सारे इतक्यात. चल तोपर्यन्त तू जरा झोप माझ्या मांडीवर.”

वीणा कीचन मध्येच तिला मांडीवर घेऊन बसली. छोटी तिच्या मांडीवर मायेच्या उबेने गाढ झोपली आणि वीणालाही बसल्या बसल्या डुलकी लागली.

जाग आली तर साडे सात वाजले होते. “अगबाई , अशोका ऊठ साडेसात वाजले. सर्वांना उठवू यात. चल येतेस का तू माझ्या बरोबर. बाळ पण उठले असेल ग आता.”

छोटी म्हणाली “ तू जाऊन ये, मी थांबते इथेच.”

ती किचनच्या बाहेर गेली. जनी कशी आली नाही अजून स्वयंपाक घरात. साडेसात वाजले. यांचा चहा, आईंची कॉफी, नाश्ता, करुणाचा टिफिन. सारे काही करायचे आहे. बहुतेक जनी आजारी असावी, म्हणूनच उठली देखील नाही काल रात्री. कितिंदा हाका मारल्या, तरी आली नाही. चला आपणच उठवावे सर्वांना.” म्हणून आधी करुणाला उठवायला ती गेली. तर करुणा आणि सासू बाई त्यांच्या खोलीत नव्हत्या.

हे काय कोणच कसे जागेवर नाही. तितक्यात कोणीतरी जोरात ओरडल्याचा आवाज आला. छोटीने काही उद्योग केला का

पाहायला ती धावत किचन मध्ये आली तर छोटी शांत बसली होती आणि वीणाचा जीव भांड्यात पडला. वीणाने तिला विचारले “ ए तू काही आवाज ऐकलास का?” छोटी ने वीणाच्या बेडरूम कडे बोट दाखवत “तिकडून आला आवाज” म्हणाली.

वीणा लगबगीने बाहेर आली. काय झाले असावे, कोण ओरडले असावे? ती धावत धावत जिन्यातून वर गेली. तिला तिच्या बेडरूममध्ये गर्दी दिसली. “अगबाई काय झाले? माझा तान्हुला तर ठीक आहे ना!” वीणाचे प्राण अगदी कंठाशी आले.

परंतु बाळ पाळण्यात शांत झोपले होते. मग करुणाचा आवाज आला “आई .... आई ” “माझ्या करुणाला काही झाले का ?” तितक्यात तिथे दामू धावत आला. तिने दामूला विचारले “काय रे दामू काय झालंय? दामूने काहीही उत्तर दिले नाही. उद्धटपणे तसाच घाईघाईत पुढे निघून गेला.

मग ती तशीच पुढे गेली. सासुबाई रडत होत्या. “अरे देवा यांनाच काहीतरी झाले वाटते, पडल्या का काय घसरून घरात?” कमलेश डोक्याला हात लावून सुन्न बसला होता. तिने कमलेशला हाक मारली, पण त्यानेही लक्ष दिले नाही. करुणा तर अजून रडत होती. शेजारच्या जोशी काकू, चितळे काकू , देशपांडे मावशी सर्व जमले होते. तिला काहीच कळेना. तिला कोणी काही सांगत पण नव्हते.

हळू हळू जनीचाही रडल्याचा आवाज येऊ लागला. “अरे बापरे असले काय झालंय. सारेच रडत आहेत ?” वीणा तशीच पुढे

निघाली, तितक्यात डॉक्टर पाटील आत आले.  सर्वांनी त्यांना पुढं जायला वाट दिली. वीणा पण त्यांच्या मागे मागे आत गेली.  कोणाला काय झालेय याचा तिला काही अंदाज येईना, त्यामुळे ती सरळ डॉक्टरच्या मागे मागे गेली.  सर्वजण बाजूला झाले. वीणाला समोर कोणीतरी तोडावर पांघरून घेऊन झोपल्याचे दिसले.  तिने जोशी काकूंना विचारले, काकू इथे कोण आहे? काकूंनी काही सांगितले नाही, नुसत्याच तोंडाला पदर लावून उभ्या होत्या. तिला कोणीच काही सांगत नव्हते.  डॉक्टर तिथे बसले आणि त्यांनी त्या व्यक्तीच्या तोंडावरील पांघरून बाजूला केले.

वीणालाही त्या व्यक्तिला पाहायची फार घाई  झाली होती.

अरे बापरे!! हे काय पाहतीय मी!! वीणाचा स्वतःच्या डोळयांवर विश्वासच बसेना. समोरचे दृश्य पाहून वीणा पूर्ण गळून गेली. तिला काहीच कळेना.  समोर बेडवर ती स्वत:च झोपली होती, निपचित, निर्विकार.

तेवढ्यात कमलेश बोलला “डॉक्टर, मी तिला केव्हाचा उठवतोय, ती उठतच नाहीये, करुणा हाक मारते. तरी उठत नाही”

तितक्यात वीणा रडवेल्या आवाजात बोलली  “अहो! अहो ही काय मी इथे आहे, मी केव्हाच उठलीये रात्री तीन वाजता आणि मला आता एकदम बरे वाटत आहे. खूप हल्के पण वाटत आहे” कमलेश

काहीच बोलला नाही .  ती परत म्हणाली "अहो खरेच सांगतीये, तुम्ही माझं  ऐकत का नाही आहात?" तरीही कमलेश शांत.

मग मात्र ती चिडली. "कमलेश .. अहो  कमलेश" म्हणून ती त्याच्या दोन्ही दंडाला पकडायला गेली, तिचे हात त्यातून आर पार निघून आले.  तिला धक्काच बसला , मग तिने कमलेश च्या गालाला हात लावण्याच प्रयत्न केला.  पण तेव्हाही तिचे हात आर पार निघून गेले.  तिने करुणाला हात लावण्याचा प्रयत्न केला , तरीही तेच .  तिने बाळाला घेण्याचा प्रयत्न केला, तरीही तसेच. मग मात्र ती हबकली. डोळयातून अश्रुधारा वाहातच होत्या.  हे काय झाले? असे का होतेय?

तेवढ्यात डॉक्टर बोलले " सॉरी मिस्टर कमलेश , पण आता मिसेस वीणा या जगात नाहीत. ही वेळ हे सारे बोलयाची नाही. पण माफ करा, मी तुम्हाला त्यांचे पाचव्या महिन्यात अबॉरशन करण्या आधी ही कल्पना दिली होती.  पण तुम्ही माझे ऐकले नाही, मुलीचा गर्भ आहे म्हणून तुम्ही काढायला लावलात. पण परत चान्स घेऊन नकात ही चेतावणी पण मी तुम्हाला दिली होती, तुम्ही ऐकले नाही आणि आज परिणाम आपल्या समोर आहे."  आणि डॉक्टर तडातड निघून गेले.  आणि सर्वजण हंबरडा फोडून रडू लागले.

वीणा तेथून बाहेर आली. एकदा करुणाला आणि बाळाला डोळेभर पाहिले आणि खूप जड पायांनी मागे दाराकडे फिरली. दारात

समोर छोटी उभी होती. रडत होती. ती भराभर छोटीकडे गेली आणि म्हणाली, तुला दिसतेय मी? तुला ऐकू येतंय मी काय बोलले ते?”

छोटी ने मान डोलावली. तिने पटकन तिला उचलून घेतले. “कोण आहेस तू, आणि  तुला मी कशी दिसते? यांना कोणालाही दिसत नाही आणि तुलाच कशी दिसते मी सांग”

छोटी सांगू लागली “आई, मी तर तुला रोजच पाहत होते. पण तुम्हा कोणालाच मी दिसत नव्हते. कारण आपली जगं वेगळी होती. पण काल तू मला पाहिलंस. तुझ्या डोळ्यांतून आरपार ममतेची भावना मला दिसली. म्हणूनच तुला जेव्हा मी दिसते हे मला कळले तेव्हा मी रडले होते ग.  तू माझ्या सोबत कायम राहणार हे ऐकूनही मी रडले होते, कारण तू माझ्या जगात आली आहेस आता, हे मला तेव्हाच कळाले होते. तू आता मला मिळणार होतीस. पण मी तितकी स्वार्थी नाही ना गं. करुणा ताईला आणि आपल्या बाळाला तुझी खूप गरज आहे, पण आता कोणीच काहीच करू शकत नाही म्हणूनच मला खूप रडू येत होते”

तिच्या तोंडून “करुणा ताई” ऐकून वीणा चपापली, म्हणाली “खरे सांग तू कोण आहेस, तू करुणाला ‘करुणा ताई’ का म्हणतेस, मी तर तुझी खरी आई नाही, मग तू मला आई का म्हणतेस?”

छोटी म्हणाली “तू माझी आईच आहेस .खरी आई.” वीणाला एक तर स्वत:चा मृत्यू सहन होत नव्हता आणि ही पोरगी अजून काय

भलतेच बडबडत होती. वीणा चिडून म्हणाली, " अग बाई नीट सांग काय ते, माझी ही दोनच मुले आहेत, मग तुझे रहस्य लवकर साग काय ते?"

छोटी परत भरल्या डोळयांनी " आई, मी पण तुझेच अपत्य आहे, मुलगी नको म्हणून तूच मला तुझ्या पोटातून काढून टाकलेस ना तीच आहे मी, तुझ्या प्रेमासाठी तहानलेली –तहानी"

वीणा हंबरडा फोडून तिला बिलगून रडू लागली, पण तो ऐकायला तिथे फक्त छोटीच होती आणि तिचे अश्रु पुसायलाही .

भारतात जन्मणाऱ्या एक कोटी मुलींपैकी

आठ लाख मुलींना जन्मापुर्वीच मारले जाते.

# ई साहित्य प्रतिष्ठान

एका छोट्याशा कथेचं हे छोटंस पुस्तक. तुमच्या मनोरंजनासाठी नक्कीच नव्हतं. होती ही एक कल्पित गोष्ट. पण त्यामागे एक भीषण वास्तव होतं. हे वास्तव आपल्या अवतीभवती घडतं आहे. आणि ते थांबवण्याची गरज आहे. हे केवळ कायद्याने करता येणं अशक्य आहे. त्यासाठी लोकशिक्षणाची गरज आहे. हे लोकशिक्षण करण्यासाठी अनेक संस्था आणि व्यक्ती अतोनात प्रयत्नही करत आहेत. पण यात जोवर प्रत्येक भारतीय सामिल होत नाही तोवर हे अपुरं आहे.

तुम्हीही तुमच्या परीने या अभियानात सामिल व्हा. आपल्या कुटुंबांत मित्रपरिवारात कन्याभ्रूणहत्येविरोधात प्रचार करा.

हे पुस्तक कसे वाटले ते नक्की कळवा. तुमचे एक पत्रही आम्हाला मोलाचे आहे.

धन्यवाद

आपले नम्र

टीम ई साहित्य